नि.फौ.ख.क्र. ७७/२०१८
निशाणी ६०

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ५ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव– सावळाराम अनंत टांककर
वय – ४५ वर्षे, व्यवसाय – शेती
रा.आरवली, सोन्सुरे, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग.

**सरतपास सहायक सरकारी वकील श्रीमती. व्ही.व्ही.ठाकूर यांच्यामार्फत सुरु–**

मी देव वेतोबा देवस्थान कमिटीमध्ये सन २०१४ पासून विश्वस्त म्हणून काम पाहतो. सध्या मी सेक्रेटरी या पदावर आहे. मी आरवली मध्ये सन २००९ ते २०१२ पर्यंत उपसरपंच म्हणून काम पाहिले आहे. सन २००५ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी श्रीदेव वेतोबा मंदिराजवळ पे ॲण्ड युज टॉयलेट शासन निधी मधून बांधले होते. पे ॲण्ड युज टॉयलेट मध्ये संडास बाथरुम पुरुषांसाठी व स्त्रियासाठी व बेसीन याचा समावेश होता. सदरचे बांधकाम सावंत यांनी केले होते. सदरचे बांधकाम सन २००६ सालापर्यंत पुर्ण झाले होते. त्यानंतर सदरचे बांधकाम ग्रामपंचायतीच्या ताब्यात घेण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी पत्र व्यवहार केला होता. परंतु सदरचे बांधकाम अपुर्ण असल्याने ग्रामपंचायतीने सदर इमारतीचा ताबा घेतला नव्हता. त्यानंतर बरीच वर्षे सदर इमारत तशीच पडून होती. त्यानंतर सन २०१४ साली गावातील काही लोकांनी सदरची वाट देवाची वाट आहे असे म्हणून सदरची इमारत जे.सी.बी.च्या सहाय्याने पाडण्यासाठी घेतली. त्यानंतर त्यांनी सदर इमारतीचा दक्षिणेकडील थोडासा भाग जे.सी.बी.च्या सहाय्याने पाडला. त्यानंतर तेथील माती व पाडलेले बांधकामाचे साहित्य डंपरमध्ये भरुन दुसरीकडे टाकले. सदरचे बांधकाम गावातील ग्रामस्थ सतिश येसजी, बाबूराव आरोलकर, गणेश रेगे या लोकांनी पाडले. बाकीच्या लोकांबाबत मला काही माहिती नाही. त्यानंतर त्याबाबतीत मी प्रतिज्ञापत्र सादर केले. ते प्रतिज्ञापत्र मी तहसिलदार यांच्याकडे सादर केले.

०२. सदर इमारत ग्रामपंचायतीच्या ताब्यात नसल्यामुळे आम्ही इमारत पाडत असताना त्याबाबत काही कार्यवाही केली नाही. त्यानंतर गावातील पोलीस पाटील मधुसुदन मेस्त्री यांनी

याबाबत ग्रामपंचायतीकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. परंतु ग्रामपंचायतीकडे सदर इमारत नोंद नसल्याने ग्रामपंचायतीने त्याबाबत काहीही कार्यवाही केलेली नाही. त्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज केला. परंतु जिल्हाधिकारी यांनी त्याबाबत काहीही कारवाई केली नाही. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्र लोकायुक्त यांच्याकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर लोकायुक्त यांनी सदर बांधकाम पाडल्याबाबत गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानंतर जीवन प्राधिकारण यांना लोकायुक्त यांनी आदेश दिले. त्यानुसार सदर व्यक्तींवर गुन्हा दाखल झाला. सतिश येसजी, बाबूराव आरोलकर, गणेश रेगे या पैकी गणेश रेगे हे मयत आहेत व आरोपी सतिश येसजी व आरोपी बाबूराव आरोलकर हे न्यायालयात हजर आहेत.

<u>सरतपास पूर्ण.</u>

<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.एस.एन.भणगे यांचेतर्फे सुरु –</u>

३. मी देव वेतोबा ट्रस्टवर सन २०१३ पासून आजरोजीपर्यंत कार्यरत आहे. ट्रस्टच्या घटनेनुसार आमचा कार्यकाल हा पाच वर्षांचा असतो. उपरोक्त न्यासाचा आता मी सचिव आहे तत्पुर्वी मी अध्यक्ष होतो. हे म्हणणे खरे आहे की या कामातील आरोपी क्र. २ बाबूराव आरोलकर वगैरे ५ यांनी धर्मदाय आयुक्त कोल्हापूर यांच्याकडे अर्ज क्रमांक २८/२०२२ दाखल केला आहे. सदर कामी आम्ही हजर झालो आहे. सदर अर्ज कोणत्या बाबतीत आहे हे मला माहिती नाही. सदर कामी मी म्हणणे दाखल केलेले आहे. सदर म्हणण्यावर मी वाचून सही केली किंवा कसे हे मला आठवत नाही. (साक्षीदाराला त्यांचे म्हणणे दाखविण्यात आले.) सदर अर्ज क्र. २८/२०२२ हा न्यासाच्या घटनेनुसार आम्ही मुदतीच्या बाहेर, मनमानी व गैरकृत्य चालविले असल्यामुळे दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की सदर कामी आरोपी क्र. २ यांनी दिलेल्या अर्जावर ट्रस्ट व ट्रस्टीज यांनी धोरणात्मक निर्णय घेवू नये असा आदेश झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की तसा आदेश झाला असताना आम्ही आदेशाचा भंग केला म्हणून आमच्याविरुध्द काम चालले व आम्ही त्यामध्ये माफीनामा लिहून दिला. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. ३ बाळकृष्ण येसजी हे देवस्थानच्या जमिनीत कुळ म्हणून लागलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. ३ यांच्या पुर्वजांची नोंद सन १९४८ साली कुळ म्हणून लागली आहे. हे म्हणणे खरे आहे की हे कुळ रद्द करण्यासाठी अपिल दाखल करावे म्हणून झालेला सुमारे ७५ वर्षांचा विलंब माफ करुन

मिळावा असा अर्ज केलेला आहे. सदरचे प्रकरण निकालावर ठेवण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. ३ याच्या कुटुंबाने चंद्रकांत आरोलकर या कुटुंबाविरुध्द ते कुळ असलेल्या मिळकतीत दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की जे काही प्रतिज्ञापत्र मी दाखल केलेले आहे त्यामध्ये एकाही आरोपीचे नाव नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की ज्या जे.सी.बी.व डंपरचा उल्लेख मी केलेला आहे तो याकामी जप्त केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की ज्या व्यक्तीच्या मालकीचा जे.सी.बी. व डंपर होता ते याकामी आरोपी म्हणून सामील नाहीत.

४. मी पोलीसांकडे दिलेल्या जबाबात किती तारखेला घटना घडली त्याचा उल्लेख केलेला नाही. सदरची तथाकथीत घटना घडताना घटनेचे फोटो काढले असे काही घडलेले नाही. पोलीस पाटील यांनी कोणती तक्रार केली, कशी कशी तक्रार केली याची मला माहिती नाही.

५. कोणतीही जमीन ग्रामपंचायतीने, जीवन प्राधिकरण यांनी किंवा अन्य सरकारी खात्याने संपादन करुन बक्षीसपत्राने घेवून त्यात सरकारी यंत्रणेचा खर्च टाकावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपंचायत व जीवन प्राधिकारण यांनी पे ॲण्ड यूज साठी कोणतीही जमीन संपादित केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की ज्या जमिनीमध्ये पे ॲण्ड यूज टॉयलेट होते ते अपूर्ण स्थितीत होते. सदरचे टॉयलेट कोणत्या जमिनीमध्ये व सर्व्हे क्रमांकामध्ये बांधले गेले व सदर जमिनीचे हस्तांतरण कोणाला केले गेले याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की सदरचे पे ॲण्ड यूज टॉयलेट ही देवस्थानच्या मालकीची नसल्याने त्यावर दुरुस्ती व खर्च करण्याचा देवस्थानाचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी सतिश येसजी, बाबूराव आरोलकर, गणेश रेगे या लोकांनी सदर पे ॲण्ड यूज टॉयलेटची तोडफोड केली हे दाखविण्यासाठी माझ्याकडे माझ्या शब्दाशिवाय कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर, 'सन २०१४ साली गावातील काही लोकांनी सदरची वाट देवाची वाट आहे असे म्हणून सदरची इमारत जे.सी.बी.च्या सहाय्याने पाडण्यासाठी घेतली, त्यानंतर त्यांनी सदर इमारतीचा दक्षिणेकडील थोडासा भाग जे.सी.बी.च्या सहाय्याने पाडला, त्यानंतर तेथील माती व पाडलेले

बांधकामाचे साहित्य डंपरमध्ये भरुन दुसरीकडे टाकले, सदरचे बांधकाम गावातील ग्रामस्थ सतिश येसजी, बाबूराव आरोलकर, गणेश रेगे या लोकांनी पाडले व बाकीच्या लोकांबाबत मला काही माहिती नाही,' खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्यविरुध्द हद्दपारी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की माझ्याविरुध्द इतर चॅप्टर केसीस दाखल झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की मी, देवस्थानचे ट्रस्टी राय, साळगांवकर, पोलीस पाटील मधुसुदन मेस्त्री, साक्षीदार मातोंडकर यांचा एक ग्रुप असून आम्ही आरोलकर व येसजी यांना त्रास देत असतो म्हणून मी खोटी केस दाखल करुन मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-
(डी.वाय.रायरीकर)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.

दिनांक- १०/१२/२०२४